# महाराष्ट्र शासन

## राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, मुंबई

मुख्य कार्यालय : ३०५, शासकीय तंत्र निकेतन इमारत, खेरवाडी, अलीयावर जंग मार्ग, वांद्रे (पुर्व), मुंबई ४०० ०५१
क्षेत्रिय कार्यालय : सीईटी सेल, शासकीय दंत महाविद्यालया समोर, सेंट जॉर्ज रुग्णालय आवार, फोर्ट, मुंबई ४०० ००१.
: सीईटी सेल, तंत्रशिक्षण संचालनालय, ३, महापालिका मार्ग, मुंबई ४०० ००१
ई-मेल - maharashtra.cetcell@gmail.com वेबसाईट :www.mahacet.org

क्र.राज्य सीईटी कक्ष/नीट युजी २०१७/नोटीस क्र.१/परीक्षा/पध्दती/६६५/२०१६ दिनांक:०६/१२/२०१६

**नोटीस**

**शैक्षणिक वर्ष २०१७ -१८ पासून आरोग्य विज्ञान व्यावसायिक पदवी पुर्व अभ्यासक्रमाचे प्रवेश NEET(National Eligibility-cum-Entrance Test)या सामाईक प्रवेश परीक्षेमार्फत करण्याबाबत...**

संदर्भ : १) शासन निर्णय क्रमांक सीईटी ३५१६/प्र.क्र.४४१/१६/ शिक्षण-२, दिनांक ०१/१२/२०१६, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई

२) शासन निर्णय क्रमांक एमईडी १०१५/प्र.क्र.३९६/१५/शिक्षण-२, दिनांक १६/१२/२०१५, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई

वरील संदर्भीय शासन निर्णयानुसार -

१) शैक्षणिक वर्ष २०१७ -१८ पासून आरोग्य विज्ञानाच्या सर्व व्यावसायिक पदवी अभ्यासक्रमांचे प्रवेश हे NEET (National Eligibility-cum-Entrance Test) या अखिल भारतीय स्तरावरील सामाईक प्रवेश परीक्षेद्वारे गुणवत्तेनुसार करण्यात येईल.

२) महाराष्ट्र शासन राजपत्र दिनांक ०३ डिसेंबर, २०१५ अन्वये एमबीबीएस, बीडीएस, बीएएमएस, बीयुएमएस, बीएचएमएस, बीपीटीएच, बीओटीएच, बीएसस्सी (नर्सिंग), बीएएसएलपी आणि बीपीॲन्डओ हे आरोग्य विज्ञान अभ्यासक्रम व्यावसायिक शैक्षणिक अभ्यासक्रम म्हणून घोषित करण्यात आले आहे.

३) वरीलप्रमाणे पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी किमान अर्हता/पात्रता ही राज्य शासनाने वेळोवेळी प्रसिध्द केलेल्या प्रवेश नियमांनुसार तथा संबंधित अभ्यासक्रमाशी संबंधित केंद्रिय परिषदेने विहित केल्यानुसार राहील.

४) आरोग्य विज्ञानाच्या सर्व शासकीय/महानगरपालिकेच्या महाविद्यालयातील व खाजगी विनाअनुदानित महाविद्यालयातील व्यावसायिक पदवी अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया (शासकीय/महानगरपालिकेच्या वैद्यकीय/दंत महाविद्यालयातील १५ टक्के अखिल भारतीय कोटा वगळून व खाजगी विनाअनुदानित महाविद्यालयातील व्यवस्थापन कोटा वगळून) NEET परीक्षेतील गुणवत्तेनुसार राबविण्याची जबाबदारी ही आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांची राहील.

तरी, राज्यातील सर्व विद्यार्थी, पालक, कनिष्ठ महाविद्यालये आणि राज्यातील सर्व आरोग्य विज्ञान अभ्यासक्रमाची महाविद्यालये यांनी वरील शासन निर्णयाची योग्य ती नोंद घ्यावी.

**(चंद्रशेखर व.ओक)भाप्रसे**
**सक्षम प्राधिकारी तथा आयुक्त,**
**राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष,**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई**